पुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: est.section@sus.ac.in, registrar@sus.ac.in
नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ आविष्कार विभाग
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
NAAC Accredited-2022 'B++' Grade (CGPA 2.96)

जावक क्र.: पुअहोसोविसो/ननवसामं अविष्कार विभाग./ 45 दिनांक 29 AUG 2025

प्रति,
**मा.संचालक/प्राचार्य**
**पु.अ.हो.सोविसो/संकुले/संलग्नित**
**सर्व महाविद्यालये/संस्था**

**विषय :- महाविद्यालय/संकुल स्तरावर आविष्कार समन्वयकाची नेमणूक करुन महाविद्यालयस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव-२०२५ चे आयोजन करणेबाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांच्या संशोधन वृतीला चालना देण्यासाठी व त्यांचे संशोधन समाजापुढे आणण्याकरिता दरवर्षी विद्यापीठस्तरीय, आंतरविद्यापीठीय, राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये सुसुत्रता आणण्याकरिता आणि संकुल/महाविद्यालय व विद्यापीठ यांच्यामध्ये प्रभावी संप्रेषणाकरिता संकुल / महाविद्यालयस्तरावर आविष्कार समन्वयकाची आवश्यकता आहे. आपल्या संकुल/महाविद्यालयामधील अनुभवी व संशोधन वृत्तीच्या प्राध्यापकांची अविष्कार समन्वयक म्हणून नियुक्ती करुन **दि. १५ सप्टेंबर, २०२५** पर्यंत प्राध्यान्यक्रमाने आविष्कार समन्वयकाचे नाव नोंदणी करावी.

संकुल/महाविद्यालयस्तरावर दिनांक **०६ आक्टोबर, ते दिनांक १५ नोव्हेंबर, २०२५** पर्यंत (विद्यापीठ परीक्षांच्या वेळापत्रका नुसार) आविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करावे यासाठी जास्तीत जास्त संशोधन विद्यार्थ्यांना यामध्ये सहभागी होण्यास प्रवृत करावे. याकरिता शक्यतो इतर संकुल/महाविद्यालयातील परीक्षक नेमून संबंधित संशोधन/ प्रकल्पाचे परीक्षण करावे व त्यातून अंतिम निवड झालेल्या संशोधक विद्यार्थ्यांच्या नोंदणीसाठी मा.संचालक/प्राचार्य व संकुल/महाविद्यालयाने नियुक्त केलेले आविष्कार समन्वयक यांनी दिनांक **०१ डिसेंबर, २०२५** पर्यंत नोंदणी करावी. संकुल/महाविद्यालयस्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या Project Synopsis चे एक पान पाठविणे गरजेचे आहे. विद्यापीठस्तरीय दोन दिवशीय आविष्कार महोत्सव हे **दि. ०८ डिसेंबर, ते २० डिसेंबर २०२५** दरम्यान (विद्यापीठ परीक्षांच्या वेळापत्रका नुसार) घेण्यासाठी आयोजन करण्यात येत आहे. यासंदर्भातील सुचना वेळोवेळी संबंधितांना देण्यात येतील.

मा. संचालक/प्राचार्य व आविष्कार समन्वयक यांच्या ई-मेलवरती अविष्कार संशोधन महोत्सवाची सर्वसाधरण मार्गदर्शक तत्वे pdf स्वरुपात पाठविण्यात येतील तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आविष्कार या मथळयाखाली प्रसिध्द करण्यात येतील. एका संशोधन प्रकल्पासाठी एकाच स्पर्धक विद्यार्थ्याची निवड करावी. याबाबत काही अडचणी असल्यास coordinator.avishkar@sus.ac.in या ई-मेलवरती किंवा अविष्कार समन्वयक/सहसमन्वयक यांच्याशी संपर्क साधावा.

वरीलप्रमाणे सर्व बाबीची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करुन विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

| उपक्रम व माहिती | प्रायोजित दिनांक |
|---|---|
| संकुल/महाविद्यालय समन्वयकांची नोंदणी | १५/०९/२०२५ पर्यंत |
| संकुल/महाविद्यालय स्तरावर आविष्कार आयोजन | ०६ ऑक्टों ते १५ नोंव्हे २०२५ |
| विद्यापीठस्तरीय आविष्कार आयोजन | ०८ ते २० डिसेंबर-२०२५ |

Registration for Collage/school Coorinator

https://forms.gle/LjP3JoRCEskAsjXh6

आपला स्नेहांकित
(प्रा.डॉ.विकास बा. पाटील)
प्र.संचालक, न.न.व.सा.मंडळ

**१.समन्वयक- डॉ विनायक पी.धुळप- ७५८८३८४५७६**
**२.सहसमन्वयक- डॉ. आशोक.आर.शिंदे- ९७६४६१७३९३**